उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१६ ■ बुधवार १९ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26



भतवाल हॉस्पिटल म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


## जगासमोर पुढील वर्षी अन्नाच्या मोठ्या संकटाची शक्यता
## भारत, ब्राझील, इंडोनेशियाने सजग व्हावे : जेपी मॉर्गन

वॉशिंग्टन, दि. १८ : जगासमोर पुढील वर्षी (२०२७) मोठे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. अमेरिकन वित्तीय संस्था जेपी मॉर्गनने तसा इशारा आहे. जेपी मॉर्गनने जागतिक अन्न संकटाबाबत सावध केले आहे. या संकटाचा सर्वाधिक फटका बसू शकणाऱ्या देशांमध्ये भारत, ब्राझील आणि इंडोनेशियाचा समावेश करण्यात आला आहे. या देशांसाठी खतांच्या पुरवठ्यातील अडथळे आणि अल निनोचा प्रभाव महत्त्वाचा ठरू शकतो. जेपी मॉर्गनच्या इशारा देणाऱ्या अहवालानुसार, भू-राजकीय तणाव, खतांची कमतरता, हवामान बदलामुळे




धोके वाढत असून या धोक्यांमुळे २०२७ मध्ये जागतिक अन्नव्यवस्थेला संकटाचा सामना करावा लागू शकतो. कृषी उत्पादनाच्या खर्चात मोठी वाढ आणि संभाव्यतः कमी उत्पादनामुळे जागतिक अन्न संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. जेपी मॉर्गन ही जगातील सर्वात मोठ्या आणि जुन्या अमेरिकन वित्तीय संस्थांपैकी एक आहे.

### जगभर महागाईचा भडका उडणार?

जागतिक अन्न संकटाचा इशारा देताना जेपी मॉर्गनने महागाईबाबतही चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या अंदाजानुसार, २०२७ च्या पहिल्या सहामाहीत जागतिक महागाई जवळपास पाच टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. यंदाच्या पहिल्या सहामाहीत हा दर सुमारे २.८ टक्के होता. या अंदाजाचा अर्थ जगात अचानक अन्नधान्याचा मोठा तुटवडा निर्माण होईल, असाही नाही. मात्र, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चात वाढ आणि प्रमुख अन्नधान्यांच्या पुरवठ्यातील कमतरतेचा सामना करावा लागू शकतो. त्याच वेळी बदलते (पान ४ वर)

## झारखंडमध्ये अखेरीस विद्यार्थी उपोषण मागे

रांची, दि. १८ : झारखंडमधील स्पर्धा परीक्षांमधील घोटाळे आणि गैरव्यवहाराच्या विरोधात गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. विद्यार्थ्यांपुढे राज्य सरकारने नमते घेत २०१४ पासून टीडीपीएल या कंपनीद्वारे घेण्यात आलेल्या सर्व स्पर्धा परीक्षा आणि त्यांचे निकाल रद्द करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयांतर दिवसांपासून उपोषणाला बसलेले आंदोलक देवेंद्र महतो यांच्यासह इतर विद्यार्थी नेत्यांनी आपले उपोषण मागे घेतले. मात्र, परीक्षा घोटाळ्यांची केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत चौकशी व्हावी, या मुख्य मागणीवर विद्यार्थ्यांचा एक गट अजूनही ठाम असून आंदोलन पुढेही सुरू ठेवण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

आरोग्य मंत्री इरफान अन्सारी, मंत्री दीपिका पांडे आणि आमदार जयराम महतो (पान ४ वर)

## भ्रष्टाचार मुक्त जिल्हा परिषदेसाठी चांगल्या लोकांना निवडून द्या- आ.चंद्रकांत रघुवंशी

**शहादा, दि.१८(प्रतिनिधी)- परिसरातील रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. परिवर्तनासह विकासाची कामे करण्यासाठी प्रयतक करू यांसाठी भविष्यात भ्रष्टाचार मुक्त जिल्हा परिषद करण्यासाठी चांगल्या विचारांच्या लोकांना निवडून द्यावे असे आवाहन करत परिसरातील समस्या सोडवण्यासाठी सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले.**




ससदे (ता.शहादा) येथे शिवसेनेच्या पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. त्यावेळी आ.चंद्रकांत रघुवंशी बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राम रघुवंशी, शिवशक्ति वाहतुक सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अशपाक शेख, शिवसेनेचे गजेंद्र शिंपी, उपजिल्हाप्रमुख डॉ.राजेंद्र पेंढारकर, उपजिल्हाप्रमुख, भानुदास पाटील, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख राजरतक बिरारे, वाहतुक सेनेचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष कैलास पावरा, शिवसैनिक रमन नवले, बुधा मोरे, कांतिलाल वळवी, मनोज पाथरवट, कल्पेश डांगळे, समाधान पवार, घनश्याम गोसावी, मयूर राजपूत, वैभव वळवी, प्रवीण सैंदाणे आदी शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी श्री रघुवंशी म्हणाले की, शिवसैनिकाने समाज उपयोगी कामे केली पाहिजे, गरिबांना मदत केली पाहिजे, शिवसेना मजबूत करण्यासाठी पक्षात येणारा प्रत्येक शिवसैनिकाने नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयतक करावा. ठराविक लोकच टेंडर घेतात कोट्यावधी रुपये खर्चूनही परिसरातील रस्त्यांची अवस्था दयनीय आहे परिवर्तन करण्यासाठी भविष्यात चांगले लोकप्रतिनिधी निवडून देण्याचे आवाहन (पान ४ वर)

## आयुर्वेदिक चुर्णाच्या नावाखाली भांगेची वाहतुक
## कंटेनरसह एकोणीस लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**धुळे, दि.१८- आयुर्वेदिक चूर्ण असे लेबल लावलेल्या बाटल्यांमध्ये मादक पदार्थ भांगच्या गोळ्यांची वाहतूक करणारा कंटेनर सोनगीर ता. धुळे जवळ धुळे एलसीबी पथकाने पकडला. चार लाखांच्या गोळ्यांसह कंटेनर असा १९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.**

मध्यप्रदेशातुन मुंबई-आग्रा महामार्गावरुन महाराष्ट्रात धुळेकडे कंटेनरने मादक पदार्थाची वाहतूक होत असल्याची माहिती पोलीस प्रशासनाला मिळाली. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांनी छाप्याचे नियोजन केले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास कारवाईसाठी रवाना केले.

पोलीस पथक, न्याय वैद्यक शास्त्र विभाग तज्ञ व पंच यांच्या पथकाने रविवारी (ता.१६) मुंबई-आग्रा महामार्ग क्रमांक तीनवरील सोनगीर टोल नाक्यावर सापळा रचला. कंटेनर (एमपी ०९/जीजी- ३१९९) अडविला, चालक-महंमद साबीर मुशरफ खान (पान ४ वर)

## जनतेच्या पैशांची लुट पटोले यांचा हल्लाबोल

मुंबई, दि. १८ : राज्यातील वाळूघाट, नाशिक कुंभमेळ्याच्या कामांमधील कथित गैरव्यवहार तसेच मतदार यादीच्या प्रक्रियेवरून काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. कुंपणच शेत खाते आहे, अशी टीका करत राज्य सरकारच्या काळात जनतेच्या घामाचा पैसा लुटला जात असल्याचा आरोप पटोले यांनी केला.

भंडारा जिल्ह्यातील वाळूघाटांच्या व्यवहारावरून सरकारला जाब विचारताना पटोले यांनी कथित हजारो कोटी रुपयांच्या प्रकरणात कोणाला पाठबळ मिळत आहे, असा प्रश्न उपस्थित केला. वाळूच्या प्रश्नावर भाजपचेच काही नेते बोलत असल्याचेही त्यांनी नमूद केले. (पान ४ वर)

## वाघमारे विरोधात गुन्हा दाखल करा
## मराठा समाजाचा पोलीस ठाण्यात ठिय्या



**धुळे, दि.१८- मराठा समाजाच्या महिलांविषयी वादग्रस्त विधान करणाऱ्या नवनाथ वाघमारे विरोधात धुळ्यात सकल मराठा समाज आक्रमक झाला असून गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी शहर पोलीस स्टेशनच्या आवारात ठिय्या आंदोलन केले आहे. यावेळी वाघमारे विरोधात मराठा समाज आक्रमक झाल्याच दिसून आलं. संबंधिता विरोधात गुन्हा दाखल न केल्यास मोर्चा काढण्याचा इशारा देखील मराठा समाजाने दिला आहे.**

एका खाजगी वृत्तवाहिनीला मुलाखत देताना नवनाथ वाघमारेने ओबीसी मंत्र्यांचे गोंडस मुले दिसताच मराठा समाजाच्या मुली त्यांच्या परात पुसत असल्याच वादग्रस्त विधान केलं होतं. या विधानानंतर संपूर्ण महाराष्ट्रभरात मराठा समाज आक्रमक झाल्याचं दिसून आलं. धुळ्यात देखील वाघमारे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी मराठा समाज आक्रमक झाल्याचं बघायला मिळाल आहे. नवनाथ वाघमारे याला असे वक्तव्य करायला लावण्यामागे कोणतीतरी शक्ती असावी, त्याशिवाय तो असे बरळणार नाही. त्या शक्तीचाही शोध घेण्याची मागणी यावेळी समस्त मराठा समाजातील पदाधिकाऱ्यांनी केली. नवनाथ वाघमारे याच्यावर तातडीने कारवाई करायची मागणीहीयावेळी करण्यात आली. (पान ४ वर)

## साक्री रोड परिसरात दोन ठिकाणी घरफोडी

धुळे, दि.१८- शहरातील साक्री रोडवरील मिनाई कॉलनीत चोरट्यांनी दोन घरे फोडून साठ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

मिनाई कॉलनीत पुनम नितीन पाटील यांचे घर आहे. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील दहा हजार रुपये, सोन्याचे काप, ओमपान, टोंगल तसेच चांदीचे कडे व अंगठी असा ४६ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. १३ ऑगस्टला घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर चोरट्यांनी याच परिसरातील दिनेश मधुकर देसले यांच्या घराचेही कुलूप तोडले. घरातून १२ हजार रुपयांसह चांदीचे जोडवे, साखळी असा १४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.



## पोस्ट ऑफिस व सेंट अँथोनी स्कूल जवळील खांबाकडे मनपाचे दुर्लक्ष

**धुळे, दि.१८- शहरातील अत्यंत गजबजलेल्या मुख्य पोस्ट ऑफिस आणि सेंट अँथनी इंग्लिश स्कूल परिसरातील एक विजेचा खांब गेल्या वीस दिवसांपासून अत्यंत धोकादायक अवस्थेत उभा आहे. दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी आणि महिला-पुरुषांची या भागातून मोठी रहदारी असते. तसेच लगतच सार्वजनिक शौचालयदेखील आहे. मात्र, ऐन वर्दळीच्या ठिकाणी अपघात घडवण्यास कारणीभूत ठरू शकणाऱ्या या खांबाकडे महानगरपालिका प्रशासनाने पूर्णपणे डोळेझाक केली आहे.**

सकाळी नियमित सफाईसाठी येणारे कर्मचारी असोत किंवा त्यांचे वरिष्ठ अधिकारी, कोणाच्याही ही गंभीर बाब निदर्शनास येऊ नये याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. समजा हा विषय संबंधित विभागाच्या अखत्यारीत येत नसेल, तरीही मनपाचे जबाबदार कर्मचारी म्हणून लाईट अथवा बांधकाम विभागाला तात्काळ कळवणे प्रशासकीय नियमानुसार आवश्यक होते. इंजिनिअर फक्त महापालिकेत बसून कागदावरच शहराची (पान ४ वर)



## वर्धापन दिनी नेत्र तपासणी, रक्तदान
## हस्ती को-ऑप बँक साक्रीचा उपक्रम

**साक्री, दि.१८- दि हस्ती को-ऑप. बँक लि., साक्री शाखेचा २९ वा वर्धापन दिन सोमवार, दि.१६ ऑगस्ट रोजी ग्राहक जागरूकता मेळावा, मोफत नेत्र तपासणी व रक्तदान शिबिराच्या आयोजनातून उत्साहात साजरा करण्यात आला. बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. हस्तीमलजी जैन यांनी रुजविलेली समाजसेवेची परंपरा आणि बँकेचे** (पान ४ वर)

## शहरातील अतिक्रमणांवर महापालिकेचा हातोडा
## संतोषी माता, स्वामी समर्थ मंदिर समोर कारवाई

**धुळे, दि.१८- शहरातील प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणांमुळे वाहतुकीस निर्माण होणारे अडथळे दूर करून रस्ते व पादचारी मार्ग मोकळे करण्यासाठी धुळे महानगरपालिकेने पुन्हा एकदा धडक अतिक्रमण निर्मूलन मोहिमेला सुरुवात केली आहे. संतोषी माता मंदिर ते फाशी पूल चौक, गुरुद्वारापासून डी-मार्टपर्यंत तसेच नदीकिनारी शिवाजी रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरासमोरील अतिक्रमणांवर महानगरपालिकेच्यापथकांकडून कारवाई करण्यात आली.**



या कारवाईदरम्यान रस्त्यालगत उभारण्यात आलेली अनधिकृत दुकाने, हातगाड्या, शेड तसेच वाहतुकीला अडथळा ठरणारे विविध साहित्य हटविण्यात आले. कारवाईत अतिक्रमणाचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. शहरातील विविध भागांत वेगवेगळ्या पथकांमार्फत ही कारवाई करण्यात येत आहे. महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस (पान ४ वर)

## राष्ट्रीय महामार्ग सुरक्षा वाढीसाठी जिल्हा महामार्ग सुरक्षा टास्क फोर्स केला गठीत

**धुळे, दि.१८- राष्ट्रीय महामार्गांवरील अवैध पार्किंग, बेकायदेशीर अतिक्रमणे आणि रस्ते सुरक्षिततेतील त्रुटी दूर करण्यासाठी तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार धुळे जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महामार्ग सुरक्षा टास्क फोर्स गठित करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपूते यांनी जारी केला आहे.**

मा. सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतलेल्या प्रकरणात संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत नागरिकांचा सुरक्षित प्रवासाचा अधिकार हा त्यांच्या जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षाविषयक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हास्तरावर उच्चस्तरीय टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. या टास्क फोर्सच्या समितीसाठी (पान ४ वर)

## प्राथ.शिक्षक पतपेढी नियमबाह्य व्याज वसुली विरोधात शिक्षक परि.ची तक्रार

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी)- धुळे व नंदुरबार जिल्हा प्राथमिक शिक्षकांची सहकारी पतपेढी मर्यादित धुळे यांच्यामार्फत जामीनकी कर्जदारांवर नियमबाह्य संपूर्ण व्याज आकारून शिक्षक सभासदांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक लूट केली जात असल्याचा आरोप एबीआरएसएम संलग्न महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग) नंदुरबार जिल्हा शाखेने केली आहे.**

याबाबत सहकारी संस्था नाशिक विभागाचे विभागीय सनिबंधक यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार पतपेढीचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नियुक्त करण्याची आणि सर्व बाधित कर्जदारांना जादा वसूल केलेले व्याज परत करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. सहकार कायदा आणि रिझर्व्ह बँक / नाबार्डच्या नियमांनुसार कर्जदाराला ज्या दिवशी प्रत्यक्ष रक्कम खात्यात जमा होते, त्याच दिवसापासून आणि केवळ वितरित रकमेवरच व्याज आकारणे बंधनकारक आहे. मात्र, पतपेढी व्यवस्थापनाने पहिला हप्ता देताच संपूर्ण मंजूर रकमेवर सुरुवातीपासून नियमबाह्य व्याज आकारणी करून शिक्षकांची उघड आर्थिक पिळवणूक चालवली आहे. या गैरप्रकाराबाबत तक्रारदार सभासद नितेंद्र चौधरी व शुभांगी सोनवणे यांनी आवाज उठवल्यानंतर पतपेढीने व्याजाचे पुनर्गणन करून अतिरिक्त वसूल केलेली व्याजाची रक्कम १ जुलै २०२६ रोजी त्यांच्या खात्यात जमा केली. यावरून

पतपेढीकडून नियमबाह्य व्याज आकारणी होत असल्याचे स्पष्ट सिद्ध झाले आहे. मात्र, हीच पद्धत नंदुरबार, तळोदा, नवापूर, शहादा, अक्कलकुवा, धडगाव व धुळे जिल्ह्यातील हजारो शिक्षक कर्जदारांच्या बाबतीत लागू असूनही (पान ४ वर)

## धुळे मनपा कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष
## अठरा तारीख उलटली तरी पगार नाही

**धुळे, दि.१८- धुळे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पगार १८ तारीख उलटून गेले तरी झाले नसल्याने कर्मचारी वर्गामध्ये असंतोषाचे वातावरण तयार झाले आहे.महापालिकेमध्ये शंभरच्या वर पेन्शनर्स कर्मचाऱ्यांची संख्या असून हे कर्मचारी पूर्णपणे त्यांच्या पेन्शनवर अवलंबून असल्याने मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहे.**

धुळे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचे नियोजन महापालिकेकडे जमा होणाऱ्या पैशातून किमान तीन महिन्याचे तरी कायम तयार असले पाहिजे.यासंदर्भातील नियोजन महापालिकेकडून होत नसल्याचे दिसत आहे. धुळे महानगरपालिकेने काही महिन्यापूर्वी तब्बल दोन महिने पेन्शन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची तसेच पगारदार कर्मचाऱ्यांचे पगार केले नव्हते. त्यावेळी सगळ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. महानगरपालिकेमध्ये सातशेच्या पुढे सफाई कर्मचारी आहेत व पगारदार कर्मचाऱ्यांची संख्या देखील मोठी आहे.या सर्वांचे पगार ग्रँड आली नाही, या नावाखाली १८ तारीख उलटून गेली तरी झालेली नाही. धुळे महानगरपालिकेत यावर कोणी प्रश्न उपस्थित करत नाही.पेन्शनर कर्मचाऱ्यांचे यामध्ये सर्वाधिक हाल आहेत. हे कर्मचारी मिळणाऱ्या पेन्शनवर अवलंबून असल्याने व रिटायर लोकांच्या औषधांचा खर्च मोठा असल्याने ते अडचणी सापडतात तर दुसरीकडे पगारदार कर्मचाऱ्यांची देखील जवळपास हीच परिस्थिती आहे. या सगळ्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष वाढत चालले असल्याने लोकप्रतिनिधी, महापौर, आयुक्त यांनी या प्रश्नाकडे लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## शहरात डास प्रतिबंधासाठी धुरळणी मोहिमेला सुरुवात
## मनपाची चार विभागामार्फत कामकाजाला सुरुवात



**धुळे, दि.१८-:पावसाळ्यात डासांची उत्पत्ती वाढून साथजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन धुळे महानगरपालिकेने डास प्रतिबंधासाठी विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याअंतर्गत चार धुरळणी मशिन कार्यान्वित करण्यात आली असून, या मोहिमेचा शुभारंभ धुळे महानगरपालिका आवारात महापौर मायादेवी परदेशी आणि महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला.**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डासांची उत्पत्ती वाढत असल्याने साथजन्य आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागामार्फत विविध प्रतिबंधात्मक (पान ४ वर)




## कमलाबाई शाळेच्या विद्यार्थिनीचे राष्ट्रीय स्तरावरील पाचवे स्थान प्राप्त

धुळे, दि.१८- धुळे येथील स्त्री शिक्षण संस्थेच्या सौ. चंदादेवी सुभाषचंद्र रुणवाल शैक्षणिक संकुलातील कमलाबाई शं. कन्या शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी .कनिष्का नितीन पाटील, रचना राकेश मोरे व दामिनी (पान ४ वर)

## हरकलाल नगरात धाडसी घरफोडी
## रोकड, तीन लाखांचे दागिने लंपास

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी)- तळोदा शहरातील हरकलाल नगर परिसरात घरात घुसून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तळोदा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी संदीप बापुराव पाटील (वय ३८, व्यवसाय-व्यापार, रा. हरकलाल नगर, तळोदा) यांच्या राहत्या घरात दिनांक १४ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते १७ ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने प्रवेश करून चोरी केली. चोरट्याने घरातून १ लाख २० हजार रुपये रोख, ९० हजार रुपये किमतीचा ३ तोळ्यांचा सोन्याचा हार, ६० हजार रुपये किमतीची २ तोळ्यांची सोन्याची चेन, १८ हजार रुपये किमतीच्या २ ग्रॅम वजनाच्या ३ सोन्याच्या अंगठ्या आणि १८ हजार रुपये किमतीच्या ३ ग्रॅम वजनाच्या २ सोन्याच्या कानातील रिंगा, असा एकूण ३ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर फिर्यादी यांनी तळोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे. गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,41,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,54,100 रु.+3% GST
चांदी- 2,40,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## ग्रामदान कायदा निरस्त करण्याचा घाट

भूदान आंदोलनानंतर आचार्य विनोबांनी ग्रामदानाची चळवळ सुरू केली होती. ग्रामदानाच्या संकल्पनेत ग्रामपंचायतचे अस्तित्व संपुष्टात येते. त्याऐवजी ग्राम मंडळाची स्थापना करण्यात येते. खातेदारांच्या सर्व जमिनी व मालकी विसर्जित करून ग्राम मंडळाच्या मालकीच्या होतात. म्हणजे सातबाराच्या उताऱ्यावर क्रमांक एकला ग्राम मंडळ आणि क्रमांक दोन वर जमीन वहीत करणाऱ्या किंवा जो मालक असेल त्याच्या नावाचा उल्लेख असतो. ही जमीन गावाच्या बाहेरच्या कोणालाही विकता येत नाही. गावातील इसमांना विकता येते. त्यामुळे बिल्डर, राजकीय व्यक्ती, कंपन्या आणि अन्य इच्छुकांना ग्रामदानी गावातील जमिनी घेता येत नाहीत. ग्रामपंचायतच्या निवडणुकी ज्या पद्धतीने होतात ती पद्धत ग्रामदानी गावात चालत नाही. ग्राम मंडळाच्या निवडणुका बिनविरोध होतात. परिणामी ग्रामपंचायतच्या निवडणुकांमध्ये जे राजकारण चालते ते ग्रामदानी गावात चालत नाही. बँकांची कर्जे वगैरे ग्राम मंडळाच्या नावाने मिळतात. त्याची वसुली आणि परतावा करण्याचे अधिकार ग्राम मंडळाकडे आहेत. शिवाय आपसातील भांडणे किंवा तंटे या मंडळातच मिटवण्याची तरतूद आहे. अशा पद्धतीने थोडक्यात ग्रामदानी गावांची आदर्श संकल्पना आहे. देशात साडेतीन हजार गावे ग्रामदानी आहेत. १९६४ साली या गावांसाठी पंडित जवाहरलाल नेहरूंनी ग्रामदान ॲक्ट मंजूर करवून घेतला. राज्यांनी तो स्वतंत्रपणे अमलात आणला. महाराष्ट्रात ग्रामदानी गावांची संख्या फक्त २० आहे. एकूण गावांची संख्या महाराष्ट्रात ४३ हजाराहून अधिक आहे. त्या तुलनेत २० गावे नगण्य आहेत.

आतापर्यंत कुठल्याही सरकारला या कायद्याची अडचण झालेली नाही. मात्र विद्यमान सरकारातील घटक पक्षाच्या दोन आमदारांना ही अडचण आहे. म्हणजेच वीस पैकी दोन गावांना इतके वर्षानंतर हा कायदा नको आहे. नव्या पिढीला जमिनी विकावयाच्या आहेत. लोकप्रतिनिधींना त्यावर कब्जा करायचा आहे. ग्रामपंचायतची स्थापना करून निवडणूक लावणे आणि गावात दुही निर्माण करणे असा त्यांचा इरादा आहे. जमिनीचे दर वाढल्यामुळे तो पैसा शेतकऱ्यांच्या नव्या पिढीला दिसतो. म्हणूनच ग्राम मंडळाकडील जमिनीची मालकी विसर्जित करून स्वत:च्या नावावर ती करणे आणि विकून टाकणे. ज्यांचा आतापर्यंत काहीही त्या गावाच्या जमिनीशी संबंध नव्हता अशा लोकांना तिथे आमंत्रित करणे आणि वीस गावांची नैतिकदृष्ट्या उंचीची जीवन शैली उध्वस्त करणे एवढे नुकसान ग्रामदानी कायदा विसर्जित करण्यामुळे होणार आहे. शासकांना त्यांच्या पक्षाच्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची मर्जी सांभाळावयाची आहे. त्या पोटी ज्या विनोबांना भारतरत्न प्रदान करण्यात आलेले आहे अशा महापुरुषाच्या संकल्पनेला तिलांजली देण्याचा घाट विद्यमान सरकारने घातला आहे. विसावे गाव चंद्रपूर जिल्ह्यातील लेखा मेंढा आहे. या गावाने हायकोर्टात पाच वर्षे लढा देऊन ग्रामदानी कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी करून घेतली. त्यात गावाच्या आसपास असलेल्या बांबूच्या जंगलांची मालकी आपल्या गावाचीच असल्याचे गावकऱ्यांनी सिद्ध करून घेतले. त्यानुसार बांबूचा लिलाव करण्याचा अधिकार लेखामेंढा गावाला मिळाला. परिणामी ग्राम मंडळाने स्थापन केलेल्या जंगल संवर्धन समितीच्या वतीने जंगलाचे नियोजन होते. तेथील जैवविविधता सध्या जिवंत आहे. जंगलाचे शोषण थांबलेले आहे. गावचे शिवार झाडाझुडपांनी समृद्ध आहे. परंतु आता सरकारने हा कायदा निरस्त करून जर ग्रामपंचायत ची निर्मिती केली तर लेखामेंढा गावासारखी वीस गावे जवळजवळ उध्वस्त होणार आहेत.

राजकीय क्षेत्रातील लोकांच्या डोळ्यात ही वीस गावे खुपतात. या गावांमध्ये विनोबांचे जन्मगाव पेण तालुक्यातील गागोदे आहे. रायगड जिल्ह्यात अनेक कंपन्यांनी पंख पसरले असून जवळजवळ सगळी जमीन कब्जात घेतली आणि असंख्य गावे भूमिहीन झाली. ते आता त्या कंपन्यांमध्ये चाकरी करीत आहेत. गागोदे येथील जमिनीवर कंपनी मालकांचा आणि राजकीय क्षेत्रातील इच्छुकांचा डोळा होताच. परंतु ग्रामदानाचा कायदा आडवा येत होता. तो निरस्त झाल्यास त्यांना गागोद्याच्या आसपासची जमीन लुटण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तीच अवस्था इतर १९ गावांच्या संदर्भात निर्माण होईल. सरकारने जानेवारी महिन्याच्या अधिवेशनातच विधी मंडळात हा कायदा रद्द करण्याची भूमिका घेतली होती. आता त्या संबंधीचे प्रारूप सरकारने जारी केले असून. त्यात विनोबा निर्मित ग्रामदान संकल्पना कालबाह्य झाल्याचे म्हटले आहे. नेमके काय कालबाह्य झाले हे मात्र या प्रारूपात स्पष्ट करण्यात आलेले नाही. ती बाब गुलदस्त्यात ठेवण्यात आलेली आहे. अतिशय हुशारीने हे प्रारूप तयार करण्यात आलेले आहे. वास्तविक घटनेतील ७३ व्या दुरुस्तीनुसार ग्रामसभेला फार महत्त्व आहे. परंतु ही ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या अधीन असल्यामुळे घटनेत तरतूद असली तरी तिला फार असे महत्त्व नाही. मात्र ग्रामदानी गावातील ग्राम मंडळांना याबाबतचा मोठा अधिकार आहे. राजकीय क्षेत्रातील लोकांना अर्थात शासक पक्षाच्या लोकप्रतिनिधींना तो अधिकार ठेवायचा नाही. विनोबांनी देशभरात भूदान आणि ग्रामदान चळवळ उभी केली असली तरी. विनोबांचे वास्तव्य महाराष्ट्रात होते. त्यांचा नैतिक दबदबा होता. सरकार त्यांचा सल्ला घेत असे. पंडित जवाहरलाल नेहरू पासून श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पर्यंतचे सर्व पंतप्रधान विनोबांच्या भेटीला येत असत. महापुरुषांच्या कर्तृत्वाचा इतिहास सध्याच्या शासकांना पुसून टाकावयाचा आहे.ते ग्रामदानी कायदा रद्द करून त्याचे अपश्रेय घेऊ इच्छितात. ही बाब योग्य की अयोग्य या संबंधीचा फैसला त्यांच्याच हातात आहे. महाराष्ट्रातील सर्वोदयाच्या चळवळीतील आणि समविचारी चळवळीतील कार्यकर्त्यांनी तसेच ग्रामदानी गावातील असंख्य सदस्यांनी हा कायदा निरस्त करण्याच्या विरोधात भूमिका घेतली असून आंदोलनाचा मार्ग निश्चित केला आहे.

१९९३ मध्ये झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार गावातील मतदारांची संस्था म्हणून ग्रामसभेची व्याख्या करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामसभा विधी ग्राह्य संस्था म्हणून प्रस्थापित करण्याऐवजी ती ग्रामपंचायतीची बटीक संस्था झाली. ग्रामपंचायतीने तिचा वापर केला. गांधीजींना जी ग्रामस्वराज्याची व्याख्या अपेक्षित होती तशी ग्रामसभा ग्रामपंचायतच्या कार्य कक्षेत प्रस्थापित होऊ शकली नाही. किंवा होऊ दिली नाही. ग्रामदान कायद्यान्वये मात्र ती कायद्यानुसार प्रस्थापित झालेली आहे. महाराष्ट्रातील वीस गावात तशी व्यवस्था आहे. परंतु तीच शासक पक्षाला नको आहे असे कायदा निरस्त करण्याच्या हालचालीवरून दिसते. दिल्ली मुंबईत आमचे सरकार आणि आमच्या गावात आम्हीच सरकार अशी ही संकल्पना असल्यामुळे ज्यांना राजकारण करावयाचे आहे त्यांची डाळ तिथे शिजत नाही. म्हणूनच हा आटापिटा चालू आहे असे समजण्यास पुष्कळ वाव आहे. शिवाय त्या त्या गावाची जमीन देखील सर्वच इच्छुकांना खुणावते आहे. प्रत्यक्षात सर्व वीस गावांच्या सदस्यांना काही अपवाद वगळले तर १९६३ पासून जी व्यवस्था चालू आहे तीच हवी आहे. निदान या गावांना तरी राजकारणापासून मुक्त ठेवावे अशी त्यांची आर्जव आहे.

## स्वातंत्र्याचे मुल्य जपण्यासाठी सेवा दल सैनिकांनी पुढाकार घ्यावा- शरद कांबळे

**धुळे, दि.१८- देश जाती,धर्म, प्रांत, भाषा यात विभागला जात असताना देशात जातीय सलोखा व एकोपा कसे ठेवता येईल यासाठी राष्ट्र सेवा दल सैनिकांनी किंमत मोजायची तयारी ठेवली पाहिजे. तसेच स्वातंत्र्याचे मूल्य जपण्याची ही वेळ आली आहे त्यासाठी सेवा दल सैनिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन ज्येष्ठ राष्ट्र सेवा दल सैनिक शरद कांबळे यांनी केले**

राष्ट्र सेवा दल, धुळे महानगरच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ध्वजारोहण कार्यक्रम महाराणा प्रताप चौक धुळे येथे मध्यरात्री १२.०१ वाजता ज्येष्ठ राष्ट्र सेवा दल सैनिक शरद कांबळे, साथी एस.आर. वाणी, सुप्रिया ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कांबळे बोलत होते. यावेळी ज्येष्ठ साथी गो.पी. लांडगे, अरुण महाले, ॲड. रवी देसर्डा, साहित्यिक जगदीश देवपूरकर, महेश बोरसे, माजी नगरसेवक मुजफ्फर हुसेन यांच्यासह राज्य मंडळ सदस्य अनिल देवपूरकर, रमेश पवार,साखर लाल देसले, मनीष केले, भास्कर बापू पाटील ,दीपक परदेशी, नितीन माने, रमेश पाकड,रामदास जगताप, दत्ता बागुल, मनोज वाघ, महेंद्र शिरपूरकर, विजय महाले ,साजिद अन्सारी, विवेक ठाकरे ,ॲड. मिलिंद बोरसे, नुरा शेख, इकबाल शहा सर, शिक्षक भारतीचे अशपाक खाटीक,रामेश्वर चौधरी, शरद शिंपी ,भैय्या पाटील, प्रवीण राठोड ,बाल सैनिक रूपेश पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व सेवा दलाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रभक्ती, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारे एकतेचे गीत सामाजिक कार्यकर्ते गायक सुरेश चत्रे यांनी सादर केले.

## वेल्हाणे देवाचे येथे चांग सुलतान यात्रा

धुळे,दि.१८- धुळे तालुक्यातील वेल्हाणे देवाचे येथे यात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

यात्रोत्सवानिमित्त दि.२५ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता काठी बसवणे, दि.२६ ऑगस्ट रोजी काठी मिरवणूक निघून यात्रोत्सवास प्रारंभ होणार आहे. दि.२७ ऑगस्ट रोजी ११.५० वाजता खुली कुस्ती दंगल होणार आहे. दि.२६ ऑगस्ट रोजी यात्रोत्सवानिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत कोणताही गैरप्रकार होवू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. चांग सुलतान यांचे दर्शन घेणे सुलभ व्हावे यासाठी वेल्हाणे ग्रामपंचायतीच्यावतीने सुविधा करण्यात आली आहे. भाविकांनी श्री स्वयंभू चांग सुलतान यात्रोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रशासक शितल राजेंद्र पाटील यांनी केले आहे.

## शिरपूर वरवाडे न.प.ला मुकेश सारवानांची भेट

शिरपूर, दि.१८- महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान हे दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी शिरपूर नगर परिषदेला भेट देणार आहेत. दुपारी ३ वाजता शिरपूर नगर परिषद कार्यालयात मुख्याधिकारी तसेच संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा व कामकाजाशी संबंधित प्रश्न, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ, आरोग्य व सुरक्षितता तसेच त्यांच्या प्रलंबित अडचणींबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. क्र. ४७६/२/अ पैकी प्लॉट नं. ३ चे एकूण क्षेत्र १७२.५० चौ. मी. १८५७ चौरस फुट यांसी लागू विस्तारीत सि. स. नं. ८३७१ चे एकूण क्षेत्र १७२.५० चौ. मी. १८५७ चौ. फुट बखळ प्लॉट.

यासी मापे चतु:सिमा

| दिशा | मापे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुर्वेस : | १५.०० मी. | प्लॉट नं. ४ |
| पश्मिेस : | १५.०० मी. | प्लॉट नं. २ |
| दक्षिणेस: | ११.५० मी. | ९ मी. रस्ता |
| उत्तरेस : | ११.५० मी. | लगत स.नं.४७७ |

येणे प्रमाणे वर्णनाची आतील बखळ प्लॉट चंद्रकला अनिल मोरे, रा. २६ सुगंध नगर मालेगांव रोड, धुळे ता. जि. धुळे ४२४००१ माझे मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी सदरहू बखळ प्लॉट कायमस्वरुपी करणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे. व बयाण्याची रक्कम ही स्विकारली आहे.

आमचे अशिल यांच्याशी सदर बखळ प्लॉटच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉटवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार, असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ पंधरा दिवसांच्या आत खालील पत्त्यावर बखळ प्लॉट संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा पपस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा बखळ प्लॉट निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणची हरकत असल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १८/०८/२०२६

**ॲड.चेतन महादु यादव**
ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ
श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५,
मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१
मो. ९६८९१२४६९२

**धुळे, दि.१८- माझे गाव, आरोग्य संपन्न गाव हे गावपातळीवर आरोग्यविषयक जनजागृती, लोकसहभाग आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारे अभियान आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावातील नागरिकांना आरोग्य सेवांबाबत जागरूक करणे, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्यविषयक उपक्रमांना चालना देणे, विविध आजारांपासून बचावासाठी जनजागृती करणे तसेच उपलब्ध आरोग्य सेवांचा नागरिकांनी अधिकाधिक लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करणे, यावर भर देण्यात येत आहे.**

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्यस्तरीय समन्वय अधिकारी श्री. अमोल पाटील यांनी धुळे तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आनंदखेडा व उपकेंद्र वार येथे भेट देऊन अभियानाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

तसेच साक्री तालुक्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक व आरोग्यसेविका यांची आढावा व नियोजन बैठक घेण्यात आली. एप्रिल पासून सुरू असलेल्या माझे गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत आतापर्यंत राबविण्यात आलेल्या विविध आरोग्यविषयक उपक्रमांचा, जनजागृती कार्यक्रमांचा, लोकसहभागाचा तसेच निर्धारित उद्दिष्टपूर्तीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

अमोल पाटील यांनी माझे गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत गावातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता, पोषण, माता व बाल आरोग्य, किशोरवयीन आरोग्य, लसीकरण, संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व तपासणी, तंबाखू व व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, सुरक्षित पाणी व स्वच्छतागृहाचा वापर यांसह विविध विषयांवर गावपातळीवर नियमित जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या.

तसेच गावपातळीवर आरोग्यविषयक उपक्रम राबविताना ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक-आरोग्यसेविका तसेच इतर संबंधित विभागांचा समन्वय वाढविण्यावर विशेष भर देण्यात यावा. नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवून गाव अधिक आरोग्यसंपन्न करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांचे योग्य नियोजन करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

## राज्य. समन्वय अधिकाऱ्यांच्या आरोग्य संस्थांना भेटी अभियानाच्या माध्यमातून गावकऱ्यांना मार्गदर्शन



अभियानांतर्गत आतापर्यंत करण्यात आलेल्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यापुढील काळात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी योग्य नियोजन, निर्धारित उद्दिष्टांची पूर्तता, नियमित आढावा, कामकाजाची अद्ययावत नोंद आणि सर्व स्तरांमध्ये प्रभावी समन्वय ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अभियान केवळ आरोग्य विभागापुरते मर्यादित न ठेवता ते गावातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. प्रभावी जनजागृती, लोकसहभाग आणि उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून अभियानाला व्यापक स्वरूप द्यावे, असे मार्गदर्शन श्री. अमोल पाटील यांनी केले. गावपातळीवर अभियानाचा व्यापक प्रचार करून नागरिकांचा सहभाग वाढविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

तसेच अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक उपक्रमाची अद्ययावत नोंद, छायाचित्रे, अहवाल व आवश्यक माहिती व्यवस्थित ठेवावी, अशा सूचना जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. जाफर तडवी यांनी दिल्या.

यावेळी डॉ. हितेंद्र गायकवाड, तालुका आरोग्य अधिकारी अक्षय कुमार राउतवड, स्टेट कोऑर्डिनेटर, मुंबई; प्रशांत सोनवणे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी जि.प.धुळे यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्राथमिक आरोग्य केंद्र आनंदखेडा येथे भेटीवेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. व्ही. पाटील व त्यांचा संपूर्ण कर्मचारी वृंद उपस्थित होते. तसेच उपकेंद्र वार येथे भेटीदरम्यान मा. सरपंच दिलीप काशिनाथ पाटील व सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## शिरपूर वरवाडे नगरपरिषद

ता. शिरपूर, जि पिन धुळे, ४२५४०५
E-mail Id:-shirpurnagarparishad@gmail.com Phone No ) ०२५६३ (२५५०४२/२५५७४२)

जा क्रं २०५२/पापुविभाग/२०२६-२०२७ दिनांक १८/०८/२०२६

**फेर जाहीर निविदा सूचना**

म.मुख्याधिकारी, शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर जि.धुळे द्वि-लिफाफा पद्धतीने कामनिहाय पात्र कंत्राटदार/मक्तेदार/पुरवठादार/विक्रेते आदी कडून खालील कामाकरिता निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा फॉर्म सदर निविदा प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत (दि.२७/०८/२०२६ पर्यंत) कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत प्रसिध्दी दिनांकापासून ते दि.२७/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. एक किंवा सर्व निविदा कांणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क न.प. राखून ठेवला आहे.

| अ.क्रं. | कामाचा तपशील | कोऱ्या निविदा फॉर्म किंमत (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभागासाठी तुरटी १६ (स्लॅब) ग्रेड-४ पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |

सही (प्रशांत सरोदे) मुख्याधिकारी — सही (चिंतनभाई पटेल) अध्यक्ष

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका,आणि संबंधितांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे वलवाडी ता. जि. धुळे शिवारातील येथील भुमापन क्र. (सर्व्हे नं.) १२५/३ पैकी प्लॉट नं. २१ त्यांसी क्षेत्र १५५ चौ. मी. बखळ प्लॉट ही मिळकत उपविभागीय अधिकारी सो. धुळे यांचे कडील ऑ. नं.एन. ए. एस. आर./५४/२०२५ दिनांक १४/११/२००५ अन्वये बिनशेती वर्ग झालेली असून मे. नगर रचनाकार सो. धुळे यांचे कडील पत्र नरधु/अभिन्यास/कावि/१९८२ दिनांक २५/०८/२०२५ अन्वये लेआउट मंजूर झालेला आहे. सदर बखळ प्लॉटहा श्री. रविंद्र गोविंद बाविस्कर यांच्या मालकीचा व कब्जे उपभोगातील असून त्याच्या चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेला : प्लॉट नं. ३२ — पश्चिमेस : १२ मीटर रस्ता
दक्षिणेला : प्लॉट नं. २२ — उत्तरेला : प्लॉट नं. २०

वर नमूद वर्णनाच्या मिळकतीचा कायमस्वरुपी खरेदीचा सौदा आमचे पक्षकारांनी सदर प्लॉटचे कायदेशीर मालक श्री. रविंद्र गोविंद बाविस्कर रा.धुळे यांचेशी लेखी सौदा पावतीद्वारे केलेला आहे व त्यापोटी त्यांनी बयाणा रक्कम स्विकारली आहे. तरी वर उल्लेख केलेल्या बखळ प्लॉट वर कोण्या व्यक्तिचा, संस्थेचा, पतपेढी, बँक इ. चा काही बोजा,कर्ज, तारण, गहाणखत, बक्षिसपत्र,सौदा पावती, टांच, वारसा हक्क इ. स्वरुपाचे व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत खालील पत्त्यावर संबंधीत मुळ कागदपत्र,लेखी पुराव्यासह संपर्क साधावा. अन्यथासदर मिळकत ही निर्बोज, निर्वेध आहे असे समजून सदर मिळकतीचा रजिस्टर खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार पूर्ण करतील.

सदर नोटीस आमचे पक्षकारांनी दिलेल्या माहिती, अधिकार व दाखविलेल्या कागदपत्रांच्या आधारे दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. १८/०८/२०२६

**ॲड.मनोज नवलराव देवरे** मो. नं. ८८३०४५७४५१/९४२३२८९१३५
७१, गुलमोहर हौ.सोसायटी, आधार नगर,पाण्याच्या टाकी शेजारी वलवाडी शिवार,देवपूर धुळे

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र. ल. येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे : स. नं. ३१पै, ३२/१ ते ३ पैकी प्लॉट नं. १४ चे एकूण क्षेत्र २७९.०० चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र १८६.०० चौ. मी. बखळ प्लॉट.**

**सि.स. उताराप्रमाणे :** सि.स. नं. ११५चे एकूण क्षेत्र ३०३.२० चौ. मी. या पैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र १८६.०० चौ. मी. बखळ प्लॉट हे **शाह रियाज अहमद अब्दुल रज्जाक** रा. अन्सार नगर,धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क,हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे

धुळे, दि. १८/०८/२०२६.


**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

### प्रकाश में आज तेवर



राजबब्बर अर्जुन कपूर सोनाक्षी सिन्हा मनोज बाजपे
दिग्दर्शक कादरखान महेंद्र मेवती राजेश शर्मा

### शब्दकोडे क्रमांक : २४३५



**आडवे शब्द :** १.मोठी नौका ३.पैसे न देता मिळालेले ६.हाव ९.एक प्रकारचे कडधान्य ११.दणकट १३.लाट १५.समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती १७.भारतातील सुट्टीचा दिवस १९.ग्राम २०.श्री रामदास स्वामी यांनी रचले ले '*** श्लोक' २१.कोयंडा २२.शुद्ध २५.चर्चा २६.स्वीकृती २९.सनी देओल,अमृता सिंग यांचा एक सिनेमा ३१.राजा ३२.भिजवलेला कागदाचा गोळा ३३.भारतात अणुचाचणी झालेले ठिकाण ३५.कडुलिंब-हिंदीत ३६.अंड्याचा पिवळा भाग ३८.कणीस ४०.दरवाजा ४१.एक मुलाचे नाव ४२.आईचा भाऊ ४३.ग्रामीण बोलीत-वर्ष ४४.पलायन करून गेलेला ४५.विवाह ४७.मुखावाटे बाहेर उच्चारले गेलेले शब्द ४८.आवरण ४९.दक्ष ५०.खोटा राग ५१.आपल्या शेजारील शत्रू देश


**उभे शब्द :** १.उत्तर २.बिकट अवस्था ४.तहपत्र ५.नजर ७.एक गोड पदार्थ ८.भेग १०.दर १२.फजिती १४.आक्षेप १५.नाम १६.किंमत १८.सुधारणा १९.स्वर्गीय गायिका लता मंगेशकर यांना मिळालेली उपाधी २३.हिंदीत-नाव २४.इंग्रजीत-पैसा २५.भारतातील सर्वात उंचावरील युद्धभूमी २७ इंग्रजीत-झोपडी २८.एक प्रकारचा सूती कपडा २९.सदैव बहरलेले असणारे ३०.पाठीचा कणा ३३. पाठीस आलेला बाक ३४.मग्न ३५.पाणी ३६.जखमेतील पू ३९.पहाटे खिडकीतून येणारे प्रकाश किरण ४०.श्री रामदास स्वामी रचित ग्रंथ ४१.सुरांची केलेली गुंफण ४२.माता सीतेला वनवासात दिसलेले हरीण ४५.वारा ४६.संगीतातील एक राग

**शब्दकोडे क्रमांक : २४३४ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | र्म | चा | री | क | र्म | चा | री | क | र्म | चा | री |
| ड | ■ | ल | ■ | त | वं | ग | ■ | मा | ला | ■ | टी |
| क | डा | ■ | ती | ■ | च | ल | न | ■ | व | ड | ■ |
| ■ | का | का | ■ | मै | ना | ■ | चि | व | ट | ■ | प |
| न | ■ | ल | ग | दा | ■ | फु | के | त | ■ | यु | रो |
| भ | रा | व | ■ | न | वा | ■ | त | न | य | ■ | प |
| ■ | व | ण | वा | ■ | म | ग | ■ | दा | ■ | मौ | का |
| भा | जी | ■ | रे | ती | ■ | र | डा | र | ड | ■ | रो |
| गा | ■ | त | मा | ■ | रा | ज | स | ■ | गा | य | ■ |
| का | ढा | ■ | प | ग | ■ | वं | ■ | घी | ■ | स | दा |
| र | ■ | ता | ■ | ज | र | त | र | ■ | भा | ■ | स |
| ■ | का | ली | च | र | ण | ■ | व | र | व | र | ■ |







## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, वित्तीय संस्था, भागिदारी फर्म सोसायटी, धर्मदाय व सहकारी संस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

मौजे चितोड धुळे ता. जि. धुळे महसूल म. न. पा. हद्दवाढ झाल्यामुळे धुळे महानगरपालिका हद्दीतील सि.स. नं./गट नं. ५/२ चे एकूण क्षेत्र ०१ हेक्टर ६८ आर. आकार ५ रु. २५ पैसे यांसी चतु:सिमा :पुर्वेस : स.नं. ०३, पश्चिमेस : स.नं. ६/१, दक्षिणेस : सर्व्हे नं. १५/१, उत्तरेस : ५/१ ही मिळकत सदर बखळ जागा मिळकत ही **कल्पना कन्हैयालाल गंगावणे, रुक्मिणी मधुकर गोंधळी, सुलोचना सुधाकर गोंधळी, कविता प्रविण जोशी, जतीन हेमकांत जोशी, दर्शना हेमकांत जोशी, दिपीका हेमकांत जोशी, मनिषा उदय जोशी, वनिशा जीवन ढवळे, महेंद्र सुधाकर दोरकर, विजया माणिक दोरकर, संतोष सुधाकर दोरकर, ज्योती विजय भोपे, सीमा बुधा श्रीखंडे** रा. ता. जि. धुळे यांच्या सामायिक हिस्स्याची आहे. सदर मिळकतही त्यांचे मालकी व कब्जे उपभोगातील मिळकत असून सदर मिळकत ही आमचे अशिल **श्री. शितलकुमार मोहन नवले, कल्पेश संजय पाटील, अर्जुन शिवाजी भामरे, अतुल रामलाल भामरे** सर्व रा. धुळे ता. जि. धुळे यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा व्यवहार केलेला आहे. तसेच त्यासंदर्भात सौदा निश्चिम केलेला असून लवकरच रजिस्टर सौदापावती व त्यानंतर खरेदीखत नोंदविणार आहेत. म्हणून सदर मिळकतीवर कोणाचाही काहीही हक्क, अधिकार, लिज, टाच, बोजा, जप्ती, बक्षिस, गहाण, खरेदी, विक्री, ताबा किंवा इतर कोणत्याही काही हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या ०७ दिवसाचे आत खालील नमूद पत्त्यावर लेखी म्हणणे सादर करावे. मुदतीत लेखी म्हणणे सादर न केल्यास या मिळकतीबाबत कोणाचीही काहीही हरकत नसल्याचे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील. तसेच या नोटीसीस कुणाचेही काहीही म्हणणे किंवा हरकत, कोणीही परस्पर वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केल्यास ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण : धुळे दि. १८/०८/२०२६

**ॲड.मयुर मेघराज बैसाणे** मो.९८८११६८३४६
(जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे)
ऑफिस: गार्डन प्रेस,विष्णुनगर, चितळे माध्यमिक विद्यालय जवळ, देवपूर, धुळे ४२४००२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था तसेच मिळकतीचे खाजगी दलालांना सर्व वित्तीय पतसंस्थांना यांसी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे जि. प. स. ता. प.स.धुळे पैकी मौजे मोराणे (प्र. ल.) ता. जि. धुळे येथील गट नं. ३७/१/अ/३७/१/ब/२/२ पैकी प्लॉट क्र. १२ /ब बखळ मिळकत यासी क्षेत्र १२१५ चौरस फुट यांसी चतु:सिमा पुढील प्रमाणे.

पुर्वेस : प्लॉट नं. १२/ब, पश्चिमेस : प्लॉट नं. १३/ब, दक्षिणेस : ९ मीटर रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. २ येणे प्रमाणे चतु:सिमा असे.

येणे प्रमाणे वर्णनांचे चतु:सिमांकीत उपरोक्त मिळकत मालक **श्री. पंकज माणिक जाधव** रा. यशवंत नगर,साक्री रोड, धुळे, ता.जि. धुळे यांनी आमचे अशिल यांना उपरोक्त मिळकत अंगभूत व तद्अंगभुत वस्तुंसह कायमस्वरूपी विक्री देणे कामी सौदा व्यवहार केला असून उपरोक्त मिळकत निर्बोज व निर्वेध आहे असे सांगितले आहे. उपरोक्त मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, तारण, वहिवाट, कुळ जमीन, जप्ती, टाच, वारस, बक्षीस, बोजा, सौदा अगर कोर्ट अधिकार असतील त्यांची हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन द्यावी. टपाल व फोनद्वारे परस्परय हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखत नोंदविण्याचा व्यवहार पुर्ण करतील. मिळकतीबाबत मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जणार नाही ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

प्रस्तुतची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १८/०८/२०२६

**ॲड.जगदीश बी.पगारे**
६१/६२ साईदर्शन, बालाजी नगर, नकाणे रोड, देवपूर धुळे ४२४००२
मो. ९९२३३१८९३३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था तसेच मिळकतीचे खाजगी दलालांना सर्व वित्तीय पतसंस्थांना यांसी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे जि. प. स. ता. प. स. धुळे पैकी मौजे मोराणे (प्र. ल.) ता. जि. धुळे येथील गट नं. ३७/१/अ/३७/१/ब/२/२ पैकी प्लॉट क्र. १३/अ बखळ मिळकत यासी क्षेत्र १२१५ चौरस फुट यांसी चतु:सिमा पुढील प्रमाणे.

पुर्वेस : प्लॉट नं. १२/अ, पश्चिमेस : प्लॉट नं. १३/अ, दक्षिणेस : ९ मीटर रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ३ येणे प्रमाणे चतु:सिमा असे.

येणे प्रमाणे वर्णनांचे चतु:सिमांकीत उपरोक्त मिळकत मालक **श्री. पंकज माणिक जाधव** रा. यशवंत नगर,साक्री रोड, धुळे, ता.जि. धुळे यांनी आमचे अशिल यांना उपरोक्त मिळकत अंगभूत व तद्अंगभुत वस्तुंसह कायमस्वरूपी विक्री देणे कामी सौदा व्यवहार केला असून उपरोक्त मिळकत निर्बोज व निर्वेध आहे असे सांगितले आहे. उपरोक्त मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, तारण, वहिवाट, कुळ जमीन, जप्ती, टाच, वारस, बक्षीस, बोजा, सौदा अगर कोर्ट अधिकार असतील त्यांची हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन द्यावी. टपाल व फोनद्वारे परस्परय हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखत नोंदविण्याचा व्यवहार पुर्ण करतील. मिळकतीबाबत मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जणार नाही ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

प्रस्तुतची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १८/०८/२०२६

**ॲड.जगदीश बी.पगारे**
६१/६२ साईदर्शन, बालाजी नगर, नकाणे रोड, देवपूर धुळे ४२४००२
मो. ९९२३३१८९३३

# मुकेशभाई आर. पटेल सैनिकी शाळेत पधरा ऑगस्ट मोठ्या उत्साहात साजरा

**शिरपूर : महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार व जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली, येथील मुकेशभाई आर. पटेल मुला-मुलींच्या सैनिकी शाळा, तांडे येथे हर घर तिरंगा अभियान , वंदे मातरम तसेच विभाजन विभीषिका स्मृती दिन हे राष्ट्रीय उपक्रम अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात संपन्न झाले.**

या विशेष उपक्रमांतर्गत शाळेत राष्ट्रध्वजाचा इतिहास, भारताचा स्वातंत्र्यलढा, स्वातंत्र्यसैनिकांचे प्रेरणादायी कार्य व राष्ट्रीय प्रतीकांवर आधारित माहितीपूर्ण प्रदर्शन आणि माहितीपट (व्हिडिओज) यांचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हिंदी शिक्षक शशिकांत जाधव यांनी प्रास्ताविक करताना वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे महत्त्व आणि त्याच्या अंमलबजावणीविषयीच्या कायदेशीर बाबींची विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

